IJNRD.ORG ISSN : 2456-4184
INTERNATIONAL JOURNAL OF NOVEL RESEARCH AND DEVELOPMENT (IJNRD) | IJNRD.ORG
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# दलित विदयार्थी चळवळीचा विकास व भवितव्य: एक समाजशास्त्रीय अध्ययन

(Development and Future of Dalit Student Movement: A Sociological Study)

डॉ. वाल्मिक धुडकू इंदासे
समाजशास्त्र विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक
क्रां. व. ना. नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय
कॅनडा कॉर्नर, नाशिक- ४२२००२

## गोषवारा (Abstract)

भारतीय समाजाच्या सम्यक परिवर्तनात सामाजिक चळवळींचे योगदान हे अतिशय महत्वाचे मानले जाते. भारताच्या सम्यक परिवर्तात ज्या सामाजिक चळवळींनी आपले योगदान दिलेले आहे त्यातील एक महत्वाची चळवळ म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभी केलेली दलित चळवळ. भारतीय समाजात अस्तित्वात असलेल्या रूढी, परंपरा, धार्मिक ग्रंथप्रामाण्य, चार्तुर्वण्य व्यवस्थेमुळे समाजात जातीव्यवस्था नावाची ,माणसा-माणसात भेद करणारी व्यवस्था निर्माण होऊन भारतीय समाजाच्या सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया कुंठीत झालेली होती. या कुंठीतपणाला छेद देण्याचा प्रयत्न केला तो महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेकरांनी यांच्या प्रयत्नातून भारतात निर्माण झालेल्या दलित चळवळीने. डॉ. बाबासेह्ब आंबेडकर यांच्या विचारातून, कर्तृत्वातून प्रेरणा घेत दलित तरुण जसे शिक्षणाकडे वळू लागले तसे त्यांना जाणीव होत गेली कि महाविद्यालये, विद्यापीठे, वसतिगृहे येथे प्रवेशासाठी मार्ग मोकळा झालेला असला तरी तेथे आपल्याला अस्पृश्य म्हणूनच हिणवले जात आहे. आणि यांतूनच दलित तरुणांच्या मनामध्ये एक असंतोष निर्माण होऊन १९६९ च्या दरम्यान मुंबई येथे “युवक आघाडी” नावाची संघटना स्थापन करण्यात आली आणि भारतातील दलित चळवळीची एक शाखा म्हणून दलित विद्यार्थी चळवळीचा प्रारंभ झाला. पुढे १९७२ मध्ये “दलित पैन्थर” सारखी स्थापना होऊन नामांतर लढा, आरक्षणाचा लढा, महाविद्यालये, विद्यापीठे, वसतिगृहे आणि शासनाच्या चुकीच्या धोरणाच्या संदर्भात लढा देण्याचे काम सुरु केल्याचे दिसून येते.

**परवलीचे शब्द (Key words) : शिक्षण, दलित चळवळ, विद्यार्थी चळवळ, दलित विद्यार्थी**

## प्रस्तावना

व्यक्तिस्वातंत्र्याला आधार मानणा-या भारतातील सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासाचा मागोवा घेतल्यास तो इंग्रजांच्या आगमनासोबत जोडला जातो. ब्रिटिशांच्या व्यक्तिस्वातंत्र्य द्दश्टिकोनाचा प्रभाव भारतातील काही सुजाण व अस्मितेची जाणीव झालेल्या व्यक्तिंवर पडुन त्यांनी भारतीय समाजात वर्षानुवर्षे धार्मिक अधिष्ठान असलेल्या जातीव्यवस्थेचा व त्या आधारे निर्माण झालेल्या जीवनपध्दतीमध्ये वैज्ञानिक व मानवतावादी वैचारिक पातळीवर त्यात बदल करण्याचा प्रयत्न करण्यास सुरूवात केला. ब्रिटिशांच्या अगोदर असा प्रयत्न झालेला नव्हता असे नाही. त्याअगोदरही काही मानवाला केंद्रिभुत मानणा-या संतांनी ही भुमिका घेतली होती परंतु तीचा आधार मात्र अध्यात्मिक स्वरूपाचा होता. त्यामुळे त्याचा संबंध तत्कालीन सत्ताधिशांनी देवळापुरताच मर्यादित ठेवला. सारांश, काय तर एखादा विचार जो पर्यंत सत्ताधिशांच्या मनी उतरत नाही तोपर्यंत तो विचार जनसामान्यांच्या मानसिक पातळीवर प्रभाव पाडू शकत नाही.

ब्रिटिशांनी मानवतावादी मूल्य स्विकारलेले असल्यामुळे साहजिकच भारतीय समाजात नवे ज्ञान, नवे विचार व मूल्ये रूजविण्याचे काम भारतातील काही जाणकार, सृजनशिल व्यक्तिंनी करण्यास सुरूवात केली. कालांतराने त्यांच्या या कार्याला सामूहिक स्वरूप प्राप्त होऊन समाजात एक सामाजिक चळवळ निर्माण होत गेली.

## भारतातील सामाजिक चळवळीची पार्श्वभूमी

भारतातील समाजसुधारणा चळवळीची पार्श्वभूमी लक्षात घेतांना १९व्या शतकाच्या सुरूवातीच्या दोन दशकात येथील समाज जीवनाचे स्वरूप कसे होते हे समजून घेणे महत्वाचे आहे. या काळात भारतीय समाजात भौतिक ज्ञान व बुध्दि प्रामाण्यवादापेक्षा रूढी, परंपरा व धार्मिक ग्रंथप्रामाण्य यांना विशेष महत्व प्राप्त झालेले होते. समाजात अस्तित्वात असलेल्या रूढी, परंपरा, व धार्मिक ग्रंथप्रामाण्यमुळे, चार्तुर्वण्य व्यवस्थेमुळे समाजात धार्मिक आधारावर स्त्री-पुरूष असमानता, माणसा-माणसात भेद करणारी अस्पृश्यता, बालविवाह, जरठ विवाह, विधवा केशवपन सारख्या काही अनिष्ट प्रथा समाजात निर्माण होऊन सामाजिक एकता किंवा सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया कुंठित झालेली होती.

ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतीय समाजात देखील अमूलाग्र बदल होऊ लागला होता. इंग्रजांच्या सुधारणावादी द्दटिकोनाचा प्रभाव पडुन भारतीय समाजातील जातीव्यवस्थेला मुळासकट उखडुन टाकण्यासाठी डॉ. भाऊ दाजी लाड, म. ज्योतिबा फुले, राजा राममोहन रॉय, सावित्रीबाई फुले, छ. शाहु महाराज, कर्मवीर विठ्ठल

रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, श्री. भास्करराव जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभ्या केलेल्या सामाजिक चळवळी महत्वाच्या ठरलेल्या आहेत

## भारतातील दलित चळवळ

दलितांच्या विकासासाठी, त्यांची जातीव्यवस्थेच्या बेडीतुन मुक्तता करण्यासाठी महाराष्ट्रातून म. ज्योतिबा फुले, छ. शाहु महाराज, कर्मवीर विठ्ठल शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर कार्य केले. त्यांनी उभ्या केलेल्या दलित चळवळीचे प्रमुख मुख्य सुत्रे पुढीलप्रमाणे सांगता येतील-

१. दलित चळवळ ही फक्त विशिष्ठ जातीपुरती मर्यादित नसुन ती व्यक्तिस्वातंत्र्याची, माणसात माणसाबद्दल माणुस म्हणुन समजण्याची सृजनशिलता निर्माण करणारी चळवळ आहे.

२. दलित चळवळ स्वतंत्रपणे सत्तासंपादनाकडे वाटचाल करणारी चळवळ आहे.

३. दलित चळवळ ही समविचारी संघटनेची अथवा व्यक्तिसोबत सुसंवाद साधणारी चळवळ आहे.

दलित चळवळीचे उपरोक्त सुत्रे दलित साहित्यविषयक, समाजविषयक अथवा चळवळीविषयक प्रसिध्द झालेल्या विविध लेखांत वेगवेगळया संदर्भात व्यक्त झालेली दिसुन येतात. आज दलित चळवळीचे संदर्भ थोडेफार जरी बदललेले असले तरी चळवळीची प्रवृत्ती मात्र तीच असल्यामुळे आजही ही सुत्रे दलित चळवळीसाठी तितकीच सक्षम व उचित ठरतात.

## दलित तरूण व दलित चळवळ

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर जी दलित चळवळ उभी राहिली त्यात तत्कालीन काळी महाविदयालयात शिक्षण घेणा-या दलित तरूणांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची चळवळ जेव्हा जोमात होती त्यावेळेचा तरूण एका विशिष्ट भावनेने झपाटलेला होता. बाबासाहेबांच्या नेतृत्वावर, त्यांच्या विचारांवर त्यांची अपार श्रध्दा होती.

महाड येथील 1927 सालच्या चवदार तळयाच्या सत्याग्रहाप्रसंगी दलितांना जो अनुभव आला त्यातुनच दलित तरूणांनी ' समता सैनिक दल' ची स्थापना केली होती. तसेच आंबेडकरांच्या नेतृत्वात दलित चळवळ असतांना तत्कालिन वेळेच्या युवकांनी आंबेडकरांचे विचार जलसांच्या माध्यमातुन गावोगावी पोहोचविण्याचे काम केलेले होते. डॉ. आंबेडकरांनी सुरू केलेल्या मुकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुध्द भारत या नियतकालिकातुन तसेच जाहिर सभेतील भाषणांतुन आंबेडकरांनी जे तत्त्वज्ञान, विचार मांडले त्याने प्रभावित होऊन अनेक पालक आपला मुलगा शिकावा अशी इच्छा मनात निर्माण करू लागला. मुलांनाही शिकावेसे वाटु लागले, ते महाविदयालयीन शिक्षणाकडे वळु लागले. परंतु महाविदयालयांमध्ये, वसतीगृहांमध्ये प्रवेश घेतल्यानंतर तेथे

त्यांना जे अनुभव येत गेले त्या अनुभवातुन दलित चळवळीची एक नवीन शाखा उदयास येत गेली ती म्हणजे दलित विदयार्थी चळवळ. किंबहुना, शिक्षण आणि त्याच्याशी संबधित इतर बाबींसाठी देखील संघर्ष करता येऊ येऊ शकतो याची जाणीवच करून देण्याचे काम या दलित विद्यार्थ्यांनी भारतीय समाजाला करून दिलेली आहे असे म्हटले तरी त्यात काहीच अतिशयोक्ती ठरणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी आणि कर्तुत्वाने उभी राहिलेली हि दलित विदयार्थी चळवळ समजुन घेतांना अगोदर जागतिक पातळीवर कार्यरत असलेल्या विदयार्थी चळवळीचे स्वरूप व त्याची उद्दिश्टये समजुन घेणे महत्वाचे आहे.

## विदयार्थी चळवळ: स्वरूप व उद्दिष्टे

विदयार्थी चळवळ म्हटल्यावर आपले लक्ष्य विदयापीठे आणि महाविदयालये यांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यावर केंद्रित होते. विद्यार्थ्यांची आंदोलने ही विविध कारणांसाठी झालेली आढळतात. सामान्यतः त्यांच्या समोर येणा-या समस्यांच्या सोडवणुकीसाठी ही आंदोलने झालेली दिसुन येतात. त्या अअनुषंगाने  टोस या समाजशास्त्रज्ञांनी विदयार्थी चळवळीचे खालील प्रमुख प्रकार सांगितलेली आहेत.

१. राजकीय चळवळ
२. आर्थिक चळवळ
३. नैतिक चळवळ
४. शैक्षणिक चळवळ
५. सामाजिक व आरक्षण विषयक चळवळ

उपरोक्त स्वरूपाच्या विदयार्थी चळवळीचे सर्वसाधारण उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांमध्ये ऐक्य निर्माण करणे.
२. उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांचा  सामाजिक, सांस्कृतिक व बौध्दिक विकास घडवुन आणणे.
३. सभोवतालच्या परिस्थिती संदर्भात जागरूकता व जाणीव निर्माण करणे.
४. शिक्षक व विदयार्थी यांच्यातले नाते दृढ करणे.
५. विदयापीठ व शासनासोबत संपर्क ठेवुन विद्यार्थ्यांच्या हिताचे प्रश्न मांडणे वत्यांच्या हितसंवर्धनाचे रक्षण करणे.
६. विद्यार्थ्यांमध्ये समाजहिताची भावना व लोकशाही मूल्यांची जोपासना करणे.
७. अन्याय व अत्याचार, चुकीची ध्येयधोरणे यांविरूध्द संघटितरित्या संघर्ष करणे.

उपरोक्त उद्दिष्ट्यांना अनुसरून भारतात १९६० नंतरच्या काळात विद्यार्थ्यांच्या विविध चळवळी झालेल्या दिसुन येतात. त्यातुन त्यांच्या विविध संघटना देखील निर्माण झालेल्या आहेत.

## दलित विदयार्थी चळवळीचे स्वरूप व वाटचाल

साधारणतः भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होऊन दलित तरूण महाविदयालयांमध्ये प्रवेश घेऊ लागलेले होते. छत्रपति षाहु महाराजांच्या धोरणातुन आरक्षणाची तरतूद, वसतिगृहांची स्थापना महाराष्ट्रातल्या काही प्रमुख शहरांमध्ये करण्यात आलेली होती. परंतु हजारो वर्षापासुन भारतीय समाजाच्या मानगुटीवर पकड ठेवलेल्या जातीव्यवस्थेने त्यांना शैक्षणिक सवलती दिल्या तरी त्यांना शैक्षणिक क्षेत्रात एक अस्पृश्य म्हणुनच वागणुक दिली जात असे. तसेच गटागटाचे राजकारण सुरू झालेले असल्यामुळे महाविदयालयात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांचा राजकीय दलित नेत्यांवरचा विश्वास उडालेला होता.

उपरोक्त संदर्भातूनच दलित तरूणांच्या विविध बदलत्या प्रवृत्ती १९६० ते १९७० च्या दरम्यान बघावयास मिळतात. शैक्षणिक क्षेत्रात आपल्याला येणा-या अडचणी आपल्यालाच सोडवाव्या लागतील याची जाणीव काही दलित विद्यार्थ्यांना घडुन आली होती. याच भावनेतुन राजा ढाले, अर्जुन डांगळे सारखे युवक एकत्र येऊन त्यांनी १९६९ च्या सुमारास मुंबई येथील सिध्दार्थ विहार वसतीगृहातील दलित विद्यार्थ्यांची ‘युवक आघाडी’ स्थापन केली.

गटागटात विभागालेले राजकीय नेते हे दलित विध्यार्थ्यांचे प्रश्न सोडवु षकत नाहीत याची खात्री पटल्यामुळे राजा ढाले, अर्जुन डांगळे, नामदेव ढसाळ, प्रा. अरूण कांबळे, जोगेंद्र कवाडे सारख्या दलित तरूणांनी महाविदयालयीन विद्यार्थ्यांना एकत्र आणुन संघटनात्मक पातळीवर लढा देण्यासाठी प्रभावी अशी संघटना असावी, या भावनेतुन १९७२ साली ‘दलित पँथर’ ची स्थापना करण्यात आली. ही संघटना एक शक्ती म्हणुन जास्त दिवस जरी टिकली नाही तरी एकूण मरगळलेल्या, शोषित, पिढीत दलित तरूणांच्या ठायी असलेली सामाजिक जाणिवेची ज्योत तिने प्रज्वलित केली, आंबेडकरी चळवळीतल्या तिस-या पिढीच्या नेतृत्वाच्या आगमनाची चाहुल वर्तविली गेली. आणि यातूनच प्रामुख्याने भारतीय दलित पँथर, दलित मुक्ती सेना, मास मुव्हमेंट, डी.एस.फोर, फुले आंबेडकर विदयार्थी परिशद (फासा) यांसारख्या विविध संघटना दलित विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्थपणे शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी निर्माण झालेल्या दिसुन येतात. नामांतर चळवळ. आरक्षणाचा लढा, विदयापीठ व शासनाच्या चुकीच्या धोरणांच्या संदर्भात लढा देण्याचे काम या दलित विदयार्थी संघटना आजतागायत करित आहेत.

## दलित विदयार्थी चळवळीचे भवितव्य

१९७० पासुन दलित तरूणांच्या शैक्षणिक क्षेत्रातील प्रश्नांच्या निराकरणासाठी संघटनात्मक पातळीवर विविध चळवळी झालेल्या दिसुन येतात. आरक्षण, विदयापीठ व शासनाच्या चुकीच्या धोरणांच्या संदर्भात लढा देण्याचे

काम दलित विदयार्थी संघटना आजही करित आहेत. परंतु असे असले तरी दलित विदयार्थी चळवळीत आज प्रभावीपणे काम करण्याची उणीव मोठया प्रमाणात दिसते. ही उणीव का निर्माण झाली यासंदर्भात काही नोंदी समोर आलेली आहेत. ते पुढीलप्रमाणे होत,

१. नामांतर, मंडल आयोग, आरक्षण असे काही प्रश्न सोडले तर मूलगामी विचार करण्याची आणि त्यानुसार संघटनेला वळण देण्याची कुवत नेतृत्वात दिसत नाही.

२. दलित विद्यार्थ्यांच्या छोटया-मोठया संघटना अस्तित्वात असल्या तरी नेतृत्वातुन होणारे वाद, फुटीरतेचे राजकारण, नवनवीन संघटनांचा उदय यांमुळे असंख्य दलित विदयार्थी आज चळवळीपासुन अलिप्त राहत आहे.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित चळवळ यशस्वि होण्यासाठी संघटनात्मक पातळीवर एकता घडविण्यासाठी प्रभावी अशी तात्विक व वैचारिक मांडणी, तत्वज्ञान आवश्यक असते, जी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर कोणीही मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत नाही याचीही उणीव दलित विदयार्थी चळवळीत प्रकर्षाने जाणवते.

एकूणच, दलित विद्यार्थी चळवळीचे भवितव्य उज्वल करावयाचे असेल, दलित चळवळ आणि त्यासोबतच दलित विद्यार्थी चळवळ जर नव्या जोमाने उभी करावयाची असेल तर वरील प्रश्नांची उत्तरे शोधणे अतिशय महत्वाचे आहे.

## सारांश

१९७० च्या दशकात निर्माण झालेल्या आणि १९९० च्या दशकापर्यंत शिक्षणक्षेत्र, समाजव्यवस्था आणि राजकीय क्षेत्रात आपले वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्या दलित विद्यार्थी चळवळीला आजच्या घडीला संरचनात्मक, व्यवस्थात्मक आणि वैचारिक स्वरूपाच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. शिक्षणाचे झालेले बाजारीकरण व खाजगीकारण, राजकारणाचे झालेले गुन्हेगारीकरण, युवकांकडे वोटिंग मशीन म्हणून बघण्याचा विकसित झालेला दृष्टीकोन यांसारख्या घटकांमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या आधारावर बळकट झालेली दलित विद्यार्थी चळवळ आज नाही म्हणायला कुठे तरी भरकटलेली आहे, संभ्रमित झालेली आहे असे म्हणायला हरकत नाही. हि परिस्थिती बदलायची असेल तर दलित चळवळीत काम करणारे दलित विद्यार्थी, कार्यकर्ते, नेते, शिक्षक-प्राध्यापक यांच्यात चळवळीसंदर्भात सकारात्मक जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे.

# संदर्भ


१. खरात शंकराव (२००६), सामाजिक चळवळीचा इतिहास, पुणे, इंद्रायणी साहित्य.

२. डांगळे अर्जुन (२००७), दलित विद्रोह, मुंबई, लोकवाङ्ममय गृह प्रकाशन.

३. पानसे सुधिर, जागतिकीकरण आणि शिक्षणक्षेत्र, नागपूर, लोकवाङ्.मय गृह प्रकाशन

४. तेलतुबंडे आनंद, सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण, नागपूर, लोकवाङ्.मय गृह प्रकाशन.

५. Shah Ghanshyam (2004), Social Movement in India, Delhi, Sage Publication.

६. Rao M. S. A. (1979), Social Movement and Social Transformation, Delhi, Macmillan Publication.

७. Banks B. A. (1972), The Sociology of Social Movement, Delhi, Macmillan Publication.